खारीला मदत घारीची

आमच्या अंगणात एक होतं झाड. झाड होत लिंबाचं. ते झाड म्हणजे छोटे छोटे पक्षी, प्राणी यांचं घरचं जणुं. त्या झाडावर एक खारुताई राहत होती. त्याचप्रमाणे एक सरडाही राहत होता. खारुताई बिचारी गरीब. उगीच चीऽऽऽची करीत फिरत राहायची. खूप खूप घाबरायची. कशालाही भ्यायची. झाडाच पान हलल तरी खारुताई चिडीचूप व्हायच्या. एरव्ही मात्र सतत त्यांचा आवाज सुरूच असायचा. त्यांनी कधी धीट होण्याचा प्रयत्न केलाच नाही. त्यांची तशी मैत्री खूपजणांशी. झाडावरचा कावळेदादा. चिऊताई, एवलीशी फुलपाखरं. या साऱ्यांशी त्यांची मैत्री. आणि हो एक मोठ्ठी घारही यायची कधीकधी त्या झाडावर. त्यांची आणि खारुताईची छान मैत्री होती. घार होती मांसाहारी. तरीही खूप प्रेमळ. तिची खारुताईशी गट्टी कशी जमली तेही मजेशीरच आहे.

खारुताई एकदा झाडावरून सरसर खाली उतरली व धूम पळत सुटली घाबरून. कशाला घाबरली म्हणता? त्यावेळी उंदिरमामाने बिळातून एकदम विचित्र आवाज काढला व ती घाबरली. इतकी धावली की घामाघूमच झाली. धावता धावता घराचा रस्ताच विसरली. मग बसली रडत बागेभोवती असलेल्या झाडाखाली बसून. तेवढ्यात वरून जाणाऱ्या घारीची नजर तिच्यावर गेली. रडणाऱ्या खारूताईला तिने विचारले, ङ्गङ्घका बरे रडतेस तू, तुला कोणी मारलं का? का कशाला घाबरलीस?फफ्रङ्गङ्घअगं, अगं, घारदीदी काय सांगू तुला माझी कहाणी, तुला उगीच त्रास कशाला,फफ्ररडत रडत खारुताईने घारीला म्हटले. घार म्हणाली, मला गं तुझी कसला आलाय त्रास, तुझं दुःख दूर करता आलं तर तेवढंच मला बरं वाटेल.

घारीचं बोलणं ऐकून तिला धीर आला. खारुताई आता सावरली, रडायचंही थोडं थांबली. तरीही मग स्फुंदतच म्हणाली, ङ्गङ्घअगं घारदीदी, मी मुलखाची वेंधळी आणि घाबरट, असे सगळेच म्हणतात. आता झाडावर आराम करीत बसले होते, इतक्यात कसल्या तरी आवाजाने घाबरले आणि सुटले की धावतच. काय करावं काहीच कळेना, आता इतक्या दूर आले आहे, की मला माझ्या घराचा रस्ताच सापडेनासा झाला आहे. मी काय करू?, कुणाला सांगू.फफ्र घार म्हणाली, ङ्गङ्घकाय सांगू आणि कसं सांगू म्हणत, तू सगळचं सांगितलं आता तुला तुझ्या घरी नेऊन सोडण्याची जबाबदारी माझी, फक्त काही खाणाखुणा सांग म्हणजे झालं. मफअसं म्हणून घारदीदीने खारुताईला खांद्यावर म्हणजे पंखाच्या मधोमध बसविले आणि तिने उड्डाण केले. घारदीदी खारुताईच्या सांगण्याप्रमाणे दिशा बदलत व मजल दरमजल करीत तिच्या झाडावरील घराकडे आली. खारुताईने ते झाड दाखवताच. घारदीदी खाली उतरली. झाडावर बसली. खारुताईची ढोली पाहिली व तिला तेथे अलगद सोडून दिले. त्यावर खारुताईने तिचे आभार मानले. तिने घारदीदीला घरी बसवले. तिने घारदीदीचा पाहुणचार केला. तिचा निरोप घेऊन घारदीदी निघून गेली. त्या दोघींची मग मैत्रीच जमली. घारदीदी अधूनमधून खारुताईकडे येई. नदीपलीकडच्या झाडांवरची फळे तिला देई. ती फळे खाऊन खारुताई खुष होई. त्या झाडावरील किड्यांची मेजवानी घारदीदीला खारुताईकडून मिळत असे. त्या दोघींची मग गट्टीच जमली होती. एकदा काय झालं, खारुताई झाडावर वरून खाली ये-जा करीत बसली होती. त्याचवेळी त्या झाडावर राहणारा एक सरडा वरून खाली येत होता. खारुताई पुढे निघाली तर हा तिची वाट अडवून उभा राहिला. भित्री

खारुताई मग सरासरा पळत दुसऱ्या फांदीवर जाऊन बसली. तिथेही सरडोबा दाखल झाले. तिला भीती घालू लागले. खारुताई खिन्न झाली. काय करावे हेच तिला कळेना. ती घाबरून गेली. कुठे पळू काय करू, हा विचार तिला सतावू लागला. सरडा तिला मारायला धावला. तशी खारुताईने खाली उडी मारली. ती सैरावैरा पळू लागली. तिने दुसऱ्या झाडावर धाव घेतली. सरड्याने ते पाहिले तोही तिच्या मागे धावला. आज खारुताईची फजिती करायची असेच त्याने बहुधा ठरविले होते. बिचारी खारुताई, काय करावं या चिंतेत असतानाच तिची नजर आकाशाकडे गेली. तो घारदीदी झाडाकडे खाली येत असलेली तिला दिसली. तिला धीर आला. आता घारदीदला सांगून या सरड्याची खोड मोडायची असे तिने ठरविले. एवढ्यात खारुताईच्या नेहमीच्या झाडावर घारदीदी येऊन बसली, ती खारुताईला शोधू लागली. परंतु खारुताई तिथे होतीच कुठे? ती तर आपली घाबरून दुसऱ्या झाडावर पळाली होती. चीऽऽचीऽऽची असा आवाज करीत घारदीदीने पुकारा केला. खारुताई दुसऱ्या झाडावरून केविलवाण्या स्वरात हळूच ओरडली, घारदीदी मला वाचव, हा सरडा बघ माझ्या मागे लागलाय! हे ऐकताच घारदीदीने दुसऱ्या झाडाकडे नजर फिरविली. तिथे एका फांदीआड लपलेली खारुताई तिला दिसली. तिने खारुताईला इशारा केला, थांब मी आले आहे. बिल्कुल घाबरू नकोस. घारदीदी दुसऱ्या झाडावर झेपावली. इतकावेळ गाफील असलेला सरडोबा घारदीदीच्या पंखाच्या आवाजाने सावध झाला, त्याने ताबडतोब आपला रंग बदलला. घारदीदी मला माफ करं मी असं पुन्हा करणार नाही. असं म्हणून त्याने आपला रंग बदलला. घारीने त्याला माफ केले, तेही खारुताईच्या सांगण्यावरून. सरडा पळाला खरा, पण त्याने मनात काही वेगळेच ठरविले होते. चार दिवसांनी खारुताईला एकटीला पाहून सरडा परत तिच्या अंगावर धावला. तेव्हा खारुताईने घारदीदीला हाक मारली. आकाशातून उंच उडणारी घारदीदी ताबडतोब खाली आली. तिने खारुताईला विचारले, काय गं काय झालं, तेव्हा तिने सरड्याची हकीकत सांगितली. यावेळी बनेल झालेल्या सरड्याने पानांच्या आड दडी मारली तेही आपला भुरा रंग बदलून हिरवा करीतच. घार त्याला शोधू लागली. पाने हललेली पाहून घार तिथे धावली. पण तेवढ्यात सरड्याने फुलांच्या पाकळ्यात आसरा घेतला, आपला रंग बदलत. तेव्हा खारुताईने एक युक्ती लढविली. सरड्याच्या मूळ रंगाच्या मातीकडे धाव घेतली. घारदीदीही आता पानांत त्याला शोधण्याचा बहाणा करू लागली. एवढ्यात सरड्याने जमिनीकडे धाव घेतली. झाडाच्या खोडावरून जाताना क्षणोक्षणी त्याचे रंग बदलत होते. परंतु तो धावतच होता. जमिनीवर पोचताच खारुताईने इशारा केला, तशी घारदीदीने खाली झेप घेत, सरड्यावर झडप घातली. त्याला पायात पकडून ती उंच उडाली, ती एकदम नदीकिनारी पोचली. सरड्याच्या गयावया करण्याकडे लक्ष न देता, तिने त्याला तापलेल्या वाळूत फेकून दिले. वाळूचे चटके बसताच, तो ओरडत, किंचाळत मरून गेला. घारदीदीने खारुताईची भीतीपासून सुटका केली.

– प्रकाश रामचंद्र क्षीरसागर